# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे – ४११००७
## Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:— शैक्षणिक वर्ष २०२५—२६ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद अंतर्गत बी.बी.ए., बी.बी.ए. (आय.बी.), बी.एम.एस., बी.सी.ए., बी.बी.ए. (सी.ए.), एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत...**

**संदर्भ :— १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/बीबीए—बीसीए/विकाप/२०२६/२१५, दि. २०/०४/२०२६.**

**२) मा. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे पत्र क्र. शुल्कनि—२०२६/प्र.क्र.१९/तांशि—४, दि. १७/०४/२०२६.**

**३) विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/१३९६, दि. ०३/०६/२०२५.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शासनाच्या संदर्भ क्र. २ अन्वये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रम प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमाकरिता शैक्षणिक वर्ष २०२४—२५ हे संक्रमण कालावधी वर्ष असल्याने, शासनाच्या दि. २०/०५/२०२५ अन्वये सदर अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने निश्चित करून, त्याबाबतची माहिती संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांना सादर करण्याचे निर्देश दिले होते.

शासन निर्देशानुसार व्यापक विद्यार्थीहित विचारात घेता, भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) अंतर्गत बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठी संबंधित विद्यापीठांनी ठरविलेले शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०२५—२६ करिता देखील लागू करावे असे कळविले आहे.

**तरी संदर्भ क्र. ३ मधील परिपत्रकान्वये वरील अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठी विद्यापीठाने ठरवून दिलेले शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०२५—२६ करिता देखील Adhoc Fee म्हणून घेण्यात यावी.** तसेच, संबंधित संस्थानी डीबीटी पोर्टलवर त्या प्रमाणे शुल्क भरून व मंजूर करून घेऊन, शिष्यवृत्ती/फी प्रतिपूर्ती योजना करिता अर्ज स्विकृती तातडीने करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या दृष्टीने तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करण्यात यावा.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | शिक्षण शुल्क रू. (Tution Fee Rs.) | विकास शुल्क रू. (Development Fee Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | B.B.A./B.B.A. (I.B.)/B.M.S./ M.B.A. (Integrated) | 35000/- | 3500/- |
| 2 | B.C.A./B.B.A. (C.A.)/ M.C.A. (Integrated) | 40000/- | 4000/- |

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी वरील प्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

गणेशखिंड पुणे — ७
संदर्भ : शै. प्रवेश/२०६३
दिनांक : २२/०४/२०२६

प्रत:
मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

F/c

DR(PG)

2014

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल-desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

कालमर्यादीत : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे

जा. क्र. १८/तंशिसं/बीबीए-बीसीए/विकाप/२०२६/ २९५
दिनांक :- २० /०४/२०२६.

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

Ph.D./M.Phil Uni... 2311
Inward No...
Date :... 22/4/26

**विषय:- बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए या अभ्यासक्रमांकरिता शै.वर्ष २०२५-२६ करिता Adhoc Fee मंजूर करण्याबाबत ...**

संदर्भ :उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. शुल्कनि-२०२६/प्र.क्र.१९/तांशि-४, दि.१७/०४/२०२६

उपरोक्त विषयाबाबत, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१७/०४/२०२६ रोजीच्या सोबत जोडलेल्या पत्राच्या अनुषंगाने, नमुद करण्यात येते की, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रम प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे संक्रमण कालावधी वर्ष असल्याने, सदर अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने निश्चित करण्याचे निर्देश दिले होते.

शासन निर्देशानुसार, व्यापक विद्यार्थीहित विचारांत घेता, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रमांचे **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी संबंधित विद्यापीठांनी ठरविलेले शुल्क हे शै. वर्ष २०२५-२६ करिता देखील लागू करावे.** तसेच, संबंधित संस्थांनी डीबीटी पोर्टलवर त्या प्रमाणे शुल्क भरुन व मंजूर करुन घेऊन, शिष्यवृत्ती / फी प्रतिपूर्ती योजना करिता अर्ज स्विकृती तातडीने करण्याबाबतची सूचना आपल्या स्तरांवरुन, सर्व संबंधित संस्थांना देण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या दृष्टीने तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. विनोद म. मोहितकर.)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२२०४०९३५
Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्रमांक : शुल्कनि-२०२६/प्र.क्र.१९ /तांशि-४ दिनांक : १७ एप्रिल, २०२६
ई-मेलद्वारे

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) कुलसचिव, सर्व संबंधित अकृषि विद्यापीठे.

३) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड.

४) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

विषयः- AICTE अंतर्गत असलेले बी.बी.ए. व बी.सी.ए. व अन्य अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत...

संदर्भ :- १) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/शा.पत्र/२०२६/१७७, दि.२०.०३.२०२६

२) शासनपत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४, दि.२०.०५.२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रम प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे संक्रमण कालावधी वर्ष असल्याने, संदर्भाधिन शासनपत्र क्र.२ अन्वये सदर अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने निश्चित करुन, त्याबाबतची माहिती संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांना सादर करण्याचे निर्देश दिले होते.

त्याप्रमाणे व्यापक विद्यार्थीहित विचारात घेता, AICTE अंतर्गत बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रमांचे शै. वर्ष २०२४-२५ साठी संबंधित विद्यापीठांनी ठरविलेले शुल्क हे शै. वर्ष २०२५-२६ करितादेखील लागू करावे. तसेच संबंधित संस्थानी डी.बी.टी.पोर्टलवर फी भरुन शिष्यवृत्ती / फी प्रतिपूर्ती योजना करिता अर्ज स्विकृती तातडीने करावी व त्याबाबतचा अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत शासनास सादर करावा.

(संतोष खोरगडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-१) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२) मा.अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

३) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई.

४) निवडनस्ती (तांशि-४)

Scanned with OKEN Scanner

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:— शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद अंतर्गत बी.बी.ए., बी.बी.ए. (आय.बी.), बी.एम.एस., बी.सी.ए., बी.बी.ए. (सी.ए.), एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत...**

**संदर्भ :— १) मा. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. बैठक–२०२५/प्र.क्र.४१/तांशि–४, दि. २०/०५/२०२५.**

**२) मा. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४–२५/१४७, दि. १०/०३/२०२५.**

**३) विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/७६२, दि. २५/०३/२०२५.**

**४) विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/८३९, दि. २८/०३/२०२५.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भ क्र. २ अन्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवीदिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना आहे त्या स्थितीत (As and where) परिषदेच्या अधिपत्याखाली अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली आहे. परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये तसेच तद्नंतरही बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना मान्यता प्रदान केली आहे. तसेच सदरहू अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश प्रक्रिया पार पडलेली आहे.

वरील अभ्यासक्रम हे प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत आले असून सदर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४–२५ हे संक्रमण कालावधी वर्ष आहे. संदर्भ क्र. २ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता संस्थांनी आकारणी करावयाचे शुल्क व अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीबाबत करावयाच्या कार्यवाहीबद्दल निर्देश देण्यात आलेले होते. त्यांस अनुसरून संदर्भ क्र. ४ परिपत्रकांन्वये तदर्थ शुल्क शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत असलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमांकरिता निश्चित करून देण्यात आले होते.

संदर्भ क्र. १ येथील शासन पत्रान्वये प्राप्त निर्देशास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत असलेल्या बी.बी.ए., बी.बी.ए. (आय.बी.), बी.एम.एस., बी.सी.ए., बी.बी.ए. (सी.ए.), एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमांकरिता खालील प्रमाणे शुल्क निश्चित करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | शिक्षण शुल्क रू. (Tution Fee Rs.) | विकास शुल्क रू. (Development Fee Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | B.B.A./B.B.A. (I.B.)/B.M.S./ M.B.A. (Integrated) | 35000/- | 3500/- |
| 2 | B.C.A./B.B.A. (C.A.)/ M.C.A. (Integrated) | 40000/- | 4000/- |

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी वरील प्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/७६२, दि. २५/०३/२०२५ व विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/८३९, दि. २८/०३/२०२५ रद्द समजण्यात यावे.

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/१३९६
दिनांक : ०३/०६/२०२५

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**
मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.